महाराष्ट्र शासन
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१
www.dvet.gov.in ; desk७@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

क्र.७/सीटीएस Minority STT/Work order/२०२२/ ५४८ दि. 20/12/2022

मंजूरी आदेश

विषय : संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासाठीचे कार्यआदेश

संदर्भ:

१. अल्पसंख्यांक विभागाचा शासन निर्णय क्र.अवि वि -२०१९/प्र.क्र.१११/का-९ दिनांक २१/०३/२०२२
२. मा. प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखली दि. १७.०३.२०२२ रोजी झालेल्या सोसायटीच्या नियामक समिती मधील सूचना
३. मराकौविसो यांचे दि. पत्र क्र. SDES-१२०१२/०१/२०२०-MSSDS-Finance/४१७ दिनांक २१.०३.२०२२
४. संचालनालयाचे पत्र क्र. ७/प्रशिक्षण/प्र.क्र.५६-२२/२०२२/३०६ दि. ०१.०८.२०२२
५. संचालनालयाचे पत्र क्र. ७/प्रशिक्षण/प्र.क्र.५६-२२/२०२२/४४४ दि. ०२.११.२०२२

१. राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत अल्पसंख्यांक समाजातील युवक - युवतीसाठी अल्प मुदतीचे कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी अल्पसंख्यांक विभाग यांच्यामार्फत संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
२. यासंबंधी नियोजन करण्यासाठी दि.०२.०९.२०२२ रोजी मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.
३. सदर बैठकीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत अल्प मुदतीचे कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी संस्थेत उपलब्ध असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम निवडून त्यासंबंधीची माहिती संचालनालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.
४. सद्यस्थितीत, सर्व प्रादेशिक कार्यालयांकडून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था निहाय अल्पमुदतीचे अभ्यासक्रमांची यादी प्राप्त झालेली आहे.
५. सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील संस्थांना सुचित करण्यात येते की, अल्पसंख्याक समाजातील महिला व युवकांना प्रशिक्षणासाठी केवळ ३० इतके उमेदवार एका बॅचसाठी पात्र राहतील.
६. महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण मंडळ यांचेकडून त्यांचे पत्र क्र. ०१/मान्यता/१५४८ दि. ०९/११/२०२२ अन्वये संबंधित संस्थांमध्ये अल्पमुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यासाठी Green Channel द्वारे संलग्नता प्रदान करण्यात आली आहे.
७. संलग्नता प्राप्त झालेल्या संबंधित संस्थेने प्रशिक्षणार्थीचे प्रवेश, प्रशिक्षण व परीक्षा वेळापत्रक व कार्यपध्दती तसेच इतर अधिक माहितीसाठी संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी

कार्यालय, प्रादेशिक कार्यालय, मंडळाचे संकेतस्थळ https://mbed.edu.in येथे संपर्क करावा व प्रशिक्षण विहीत वेळेत पुर्ण करावे.

८. अल्पसंख्याक समाजातील महिला व युवकांकरीता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी मंडळाव्दारे संलग्नता दिलेल्या संस्थांची यादी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना अग्रेषित करण्यात आली आहे.

९. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्या संकेतस्थळावर तुकडी निर्माण करणे, प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांची माहिती अद्यावत करणे, हजेरी नोंदविणे, इत्यादी कार्यवाही संबंधीत संस्थेने पूर्ण करणे आवश्यक आहे तसेच संबंधित प्रशिक्षणार्थ्याचे प्रत्येकी प्रवेशापासून रोजगार प्राप्त होईपर्यंत नोंद ठेवावी.

(दि. अं. दळवी)
संचालक

प्रति,
प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
(अल्पसंख्यांकासाठी अल्पमुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्था)